जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -४३२ दिनांक - १२/१०/२०२४**

बिबवेवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर

## पुजा-याला किडनॅप करून कर्नाटक येथे डांबून ठेवून खंडणी मागणा-या सराईत आरोपींना जेरबंद

दि.२९/०९/२०२४ रोजी ते दि.३०/९/२०२४ रोजी दरम्यान आरोपी १) रामु अप्पाराय बळुन,वय २९ वर्षे रा. त्रिकुंडी, ता.जत,रा.सांगली २) दत्ता शिवाजी करे वय २० वर्षे रा. सदर ३) हर्षद सुरेश पाटील वय २२ वर्षे रा.आसंगी,ता.जत, जि.सांगली व त्यांचे साथीदार हे फिर्यादी यांचे घरी आले. फिर्यादीचा मुलगा यांस भेटुन विजापुर, कर्नाटक येथे घराची पुजा करायची आहे असे आमिष दाखवून,कर्नाटक येथे पुजारी व त्यांचे सोबतचे शिष्य यांना घेवून जावून पिस्तुल व हत्यारांचा धाक दाखवून किडनॅप करून ५ कोटीच्या खंडणीसाठी त्यांना डांबुन ठेवून ठेवल्याचे तक्रारीवरून बिबवेवाडी पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चेकलम १४०(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयाचा तपास करीत असताना तपास पथकाला आरोपी यांनी पुजारी व त्याचे शिष्यांना कर्नाटक येथे सिंधनूर जवळ डांबून ठेवले असल्याची खात्रीशीर माहिती तपास पथकाचे प्रभारी पोउपनि अशोक येवले पोलीस अंमलदार सुमीत ताकपेरे व जोतीष काळे यांना मिळाली असता त्यावरून वपोनि मंगल मोढवे यांनी तात्काळ सदरबाबत माहिती वरिष्ठांना कळवून लागलीच तपास पथकाचे प्रभारी पोउपनि अशोक येवले यांचेसह पोलीस अंमलदार सुमीत ताकपेरे व जोतीष काळे यांना रवाना केले.

सिंधनूर, कर्नाटक येथे पोहचल्यानंतर स्थानिक पोलीसांची मदत घेवून मिळालेल्या बातमीचे ठिकाणी गेले असता आरोपी यांनी पुजारी व त्याचे शिष्यांना एका निर्जन ठिकाणी असलेल्या बंद रूममध्ये डांबून ठेवल्याचे दिसून आलेने पोलीसांना पाहुन नमुद आरोपी पळून जात असताना पोउपनि येवले, व स्टाफ यांनी स्थानिक पोलीसांच्या मदतीने त्यांना हत्यारासह ताब्यात घेवून पुजारी व त्याच्या ३ शिष्यांची सुखरूप सुटका केली.तसेच आरोपींनी आणखीन ४ शिष्यांना दुसरीकडे डांबून ठेवले होते त्यांची देखील शिताफीने सुटका केली.सदर आरोपी यांनी किडनॅप करण्याकरीता वापरण्यात आलेली हत्यारे ताब्यात घेवून त्यांना बिबवेवाडी पोलीस ठाणे येथे आणून त्यांच्याकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास करून नमुद आरोपी यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त, श्री मनोज पाटील, मा. पोलीस उप-आयुक्त,परि-५ श्री आर राजा, मा.सहा पोलीस आयुक्त, श्री.धन्यकुमार गोडसे, वानवडी विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीमती मंगल मोढवे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री.मनोजकुमार लोंढे,तपास पथकाचे प्रभारी पोलीस उप-निरीक्षक, श्री अशोक येवले,पोलीस अमंलदार संजय गायकवाड,संतोष जाधव, सुमित ताकपेरे, ज्योतिष काळे, आशिष गायकवाड,प्रणय पाटील, शिवाजी येवले,विशाल जाधव, नितीन कातुर्डे, अभिषेक धुमाळ यांनी केली आहे.